# विश्वबंधुत्व

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे त्रैमासिक

एप्रिल – मे – जून २०२४

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०२४ अंक २

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | अ.क्र. | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | **संपादकीय,** ॲड. संजय पोटे, पुणे | १ |
| २ | **ॲनी बेझंट यांचा म.थि.फे. ला संदेश,** कै. र.गं. भडभडे, पुणे | २ |
| ३ | **थिऑसॉफिकल सोसायटीच्या आद्य संस्थापिका** | ३ |
| | **मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांचा स्मृतिदिन: व्हाईट लोटस डे,** डॉ. ए.एस. सोनोने. अकोला. | |
| ४ | **सेवाकार्याचे चार आधार,** डॉ. श्रीकांत उखळकर, अकोला. | ६ |
| ५ | **अध्यात्माचे वैज्ञानिक स्वरुप,** श्री. गजानन देशपांडे, अकोला. | ९ |
| ६ | **चला पुन्हा विश्व गुरु होऊ या!,** डॉ. किरण वाघमारे, अकोला. | १२ |


या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.

**प्रकाशक**

**अध्यक्ष**

**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

# संपादकीय

नमस्कार.

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनशी संलग्न सर्वच लॉजेस व सेंटर मध्ये रविवारच्या सभा तसेच विविध उपक्रम घेण्यासाठी सर्वप्रकारे प्रयत्न होतांना दिसत आहेत.

आज प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्यात येणाऱ्या सभा, लेक्चर्स आणि कार्यक्रमा सोबतच ऑनलाईन पद्धतीने देखील व्यापक प्रमाणात उपक्रम होत आहेत.

ऑनलाईन कार्यक्रम हे सर्वत्र आणि सर्वांसाठी आणि सर्वांना सोयीस्कर अशावेळी घेण्यात येत आहेत.प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी रात्री राष्ट्रीय व्याख्यात्या भ. सक्सेना, प्रत्येक मंगळवार व शुक्रवार सायंकाळी बंधू बुरसे घेत असलेला अभ्यासवर्ग, प्रत्येक गुरुवारी रात्री भ.गोखले ह्यांचे उपनिषद संबंधी व्याख्यान, प्रत्येक शुक्रवारी रात्री लेट्स रीड थिऑसॉफी अंतर्गत बंधू भडभडे व भ.रशिदा आणि जोशी हे करीत असलेल्या एका पुतकाचे वाचन इत्यादी ऑनलाईन कार्यक्रमांना आपले सभासद व इच्छूक श्रोतृवर्ग आवर्जून हजेरी लावत आहेत ही आनंदाची बाब आहे.

थिऑसॉफीच्या प्रचार व प्रसारासाठीचा एक विशेष निधी हा इंडियन सेक्शन कडून आपणास मिळाला आहे. थिऑसीफिकल शिकवणीचे मोठ्या प्रमाणात लिखाण होऊन त्याचे महत्व समाजातील वेगवेगळ्या व्यक्तींपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. आपण जिथे जसे आहोत तेथे आपापल्या कुवतीनुसार सर्वांनी ह्याकामी योगदान देणे अपेक्षित आहे. ह्याच अनुषंगाने नमूद करावेसे वाटते की, मालेगाव (नाशिक) परीसरातील थिऑसॉफीच्या कार्याचा आढावा घेऊन बंधू डॉ.डोळे ह्यांनी आपल्या वयोवृद्धत्वाची तमा न बाळगता ह्या कार्याच्या सविस्तर वर्णनाचे लिखाण करून एक पुस्तिका नुकतीच प्रसिद्ध केली आहे.

थिऑसॉफीच्या शिकवणी संबंधी आपणा सभासदांना माहिती असणे गरजेचे आहे. मागील वर्षी प्रसिद्ध केलेल्या आणि सर्व सभासदांना देण्यात आलेली दिनदर्शिका ह्या दृष्टीने उपयुक्त आहे असे अनेक जणांनी कळविले आहे. ह्या दिनदर्शिके मध्ये देण्यात आलेली माहिती संकलित करून 'विश्वबंधूत्व' च्या पुढील अंकात प्रसिद्ध करू या.

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनने दि.२६ ते ३१ मे दरम्यान भोवाली (उत्तराखंड )येथे अभ्यास वर्ग आयोजित केला आहे. हा अभ्यासवर्ग नाविण्यपूर्ण असेल कारण ह्या अभ्यासवर्गात बहुतांशी उपस्थिती युवा वर्गाची आहे. युवा वर्गाला मार्गदर्शन करणारे देखील (वरिष्ठ )युवा आहेत. कर्माचा सिद्धांत हा ह्या अभ्यासवर्गाचा विषय आहे.बंधू जोशी,वागदेव,भ.वानखडे,गायधणी व सहकारी ह्यासाठी परिश्रम घेत आहेत. युवक,युवतींसाठी घेण्यात येणारा असा उपक्रम इंडियन सेक्शनमध्ये प्रथमतःच होत आहे ही आपणा सर्वांसाठी गौरवाची बाब आहे.

अकोला लॉज येथे ' जीवन कौशल्य विकास' शिबीर दि. ६ ते ८ मे दरम्यान घेण्यात येईल. पुणे लॉज मध्ये कौशल्य विकास व जीवन शिक्षण ह्या विषयावर दोन दिवशीय सेमीनार दि.११ व १२ मे रोजी होईल. ह्या सर्व उपक्रमांच्या आयोजकांचे खूप खूप कौतुक.

मराठी फेडरेशन च्या कार्यकारी मंडळाची आणि सर्व लॉजेसच्या पदाधिकारी ह्यांची संयुक्त सभा व एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन पुणे येथे जून महिन्यात करण्यात आले आहे.

सदरील अंक व्हाईट लोटस डे निमित्य प्रकाशित करण्यात येत आहे. ह्या अंकामधील सर्वच लेख वाचनीय व प्रबोधनाचे आहेत. सोबत लॉज वार्ता आणि टी ओ एस संबंधी माहिती आहे. सर्व लॉजेसनी आपल्या लॉज-वार्ता आमच्या पर्यंत पोहचवावयात ही पुनःश्च विनंती.

**- संजय पोटे**

अध्यक्ष

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

# ॲनी बेझंट यांचा म.थि.फे. ला संदेश

अनुवाद - कै. र. गं. भडभडे, पुणे.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या तत्कालीन अध्यक्षा डॉ. ॲनी बेझंट यांनी ३० ऑगस्ट १९१३ रोजी मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनने नव्याने सुरु केलेल्या मासिकासाठी शुभेच्छा संदेश अड्यार, चेन्नई येथून स्वतःच्या हस्ताक्षरात पाठविला होता. त्यात त्यांनी सुचवले होते की ह्याचे मराठी भाषांतर करून ते छापावे. येथे त्या पत्राचे मराठी भाषांतर देत आहोत.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या प्रगतीच्या अनेक लक्षणांपैकी एक आहे, तिचे नित्य विस्तारणारे वाङ्मय. त्यासाठी मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनच्या नवीन मासिकाचे मी सहर्ष स्वागत करते. ते स्थानिक मराठी भाषेत प्रसिद्ध होणार आहे हे विशेष आंनदाचे आहे. आई जी भाषा बोलत बाळाला कुरवाळते, गोंजारते, ती भाषा नेहमीच माणसाच्या हृदयाला भिडते आणि मातृभाषेचा साज चढवून प्रज्ञान सांगीतले जाते तेव्हा त्याहून प्रभावी अन्य काही नसते.

याशिवाय महाराष्ट्रात वैभवशाली धार्मिक परंपरा आहे व ज्या भाषेमध्ये असे (उच्च) दर्जेदार वाङ्मय आहे त्या भाषेचा आदर आणि रक्षण केले पाहीजे. महाराष्ट्रातील महान संत जागतिक महत्वाचे आचार्य (teachers) आहेत. जगाच्या लाभासाठी त्यांच्या शिकवणीचे (teachings) भाषांतर केले जावे. परंतु त्याचबरोबर ज्या भाषेमध्ये त्यांचा प्रथम उद्घोष झाला, त्या भाषेत ते अजरामर झाले पाहिजे.

बंधूनो, ते वैभवशाली साहित्य क्षेत्र तुमच्यासमोर कार्यासाठी खुले आहे. ज्या लोकांमध्ये नियतीने तुम्हाला जन्माला घातले आहे, त्या महाराष्ट्रीय लोकांपेक्षा अधिक तल्लख मेंदूचे भारतामध्ये दुसरे कोणी नाहीत. त्यांच्याहून अधिक तल्लखबुद्धी असणारे (virile) अन्य मानव-वंश (race) नाही. तुम्ही मर्द माणसे जमवा, दुबळी नकोत. महात्म्यांच्या आशीर्वादानी बलवान व्हा, ज्ञानप्रकाश मिळवा आणि प्राप्त झालेल्या या अजोड संधीचा उत्तम व पुरेपूर सदुपयोग करा.

**- ॲनी बेझंट**

**थिऑसॉफिकल सोसायटी,**

**अड्यार, मद्रास. ऑगस्ट ३०, १९१३**

# थिऑसॉफिकल सोसायटीच्या आद्य संस्थापिका मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांचा स्मृतिदिन: व्हाईट लोटस डे

**– प्रा.डॉ.ए.एस.सोनोने**

थिऑसॉफिकल सोसायटीच्या संस्थापिका मॅडम ब्लॅव्हॅट्रस्की यांचा ८ मे हा स्मृतिदिन .८ मे १८९१ रोजी त्यांनी आपला भौतिक देह ठेवला. त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून व्हाईट लोटस डे साजरा केला जातो. मॅडम ब्लॅव्हॅटस्की यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या स्मृतिदिनी सर्व सभासदांनी आपआपल्या शाखे मध्ये एकत्र येऊन एडविन अर्नोल्ड यांच्या लाईट ऑफ एशिया आणि भगवद्गीतेतील एका प्रकरणाचे वाचन करून अभिवादन करावे. सोसायटीचे तत्कालीन अध्यक्ष H.S.Olcot तथा सर्व कार्यकारी मंडळाने एप्रिल १८९२ मध्ये घेतलेल्या ठरावा प्रमाणे यादिवशी व्हाईस ऑफ द सायलेन्स या ग्रंथातील सुध्दा काही पाठाचे वाचन करण्यात यावे असे ठरविण्यात आले.

मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांनी संपूर्ण मानवतेला दिलेली सेवा तसेच थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना करून संपूर्ण मानवजातीच्या उत्थानासाठी केलेले प्रयत्न याची आठवण म्हणून त्यांचा स्मृतिदिन व्हाईट लोटस डे म्हणून साजरा करण्यात येतो.

मॅडम ब्लॅव्हॅट्रस्की यांचा जन्म दिनांक १२ ऑगस्ट १८३१ ला रशियातील एका रेतीनोस्लॉव्हया गावी झाला. लहानपणा पासूनच त्यांना अध्यात्मिक अनुभव यायला लागले होते त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे एक चमत्कारच आहे.

त्यांनी आपल्या प्रापंचिक जीवनाचा त्याग करुन संपुर्ण जीवन मानवाच्या अध्यात्मिक कल्याणासाठी वाहून दिले. विवाह सुध्दा केला तो ही नावा पुरताच. त्यांचे मन प्रपंचात रमले नाही संत तुकाराम महाराजांच्या भाषेत बोलायचे झाल्यास म्हणता येईल.....

**संसाराचे नावे घालोनिया ।।**

**वाढता हा पुण्य धर्म केला ।।**

HPB नि Theosophical Society च्या माध्यमातून जगभरातील सर्वधर्मातील लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. १९०० व्या शतकात भौतिकतेकडे झुकलेल्या जगाला अध्यात्मिक व नैतिक अधिष्ठान त्यानी दिले. अशा या महान विभूतिला त्यांच्या स्मृति दिनी विनम्र अभिवादन.

थिऑसॉफिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष अरुंडेल यानी लोटस बद्दल लिहिताना म्हटले आहे..

Lotus is perhaps the supreme manifestation of perfect life. Lotus has a life cycle. सनातन धर्मा मध्ये सुद्धा कमळाला. - symbol of beauty and the the state of non-attachment. असे म्हटले आहे. यावरून आपल्या लक्षात येते की, व्हाईट लोटस हे नाव देण्या मागे फार मोठा संदेश थिऑसॉफिकल सोसायटीने समाजाला दिला आहे.

मॅडम ब्लॅव्हॅट्रस्की यांचे आध्यात्मिक जीवन आम्हा सर्वांना मार्गदर्शक आहे. तशाच प्रकारच्या जीवनाची अपेक्षा सर्वसभासदाकडून अपेक्षित आहे. त्यांच्या स्मृतीदिनी ही आठवण करून देणे हा या मागचा उद्देश आहे.

यातील 'व्हाईट' हा शब्द पवित्रतेचे आणि शुद्धतेचे प्रतीक आहे तर कमळ हे मानवी जीवनाचे प्रतीक आहे.

कमळाचा जन्म चिखलात / पाण्यात होतो; तरी पण कमळ आपल्याला चिखलापासून दूर ठेवते आपल्या अंगाला चिखल लागू देत नाही.

मानवी जीवनात सुद्धा मानव व्यावहारिक जीवन जगताना चांगले-वाईट कर्मे त्याच्या हातून घडतात.

साधकाच्या हातून निष्काम कर्म घडने अपेक्षित आहे (Selfless). कर्मा मुळेच जन्म - मृत्यू आहे. साधकाला मुक्तीसाठी त्याने या व्हाईट लोटस सारखे संसारात राहून सुद्धा संसाराची Attachment सोडून जीवन जगणे अशी अपेक्षा आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात -

**तुका म्हणे आम्ही झालो अग्नी रुप**
**लागूने दीपा प-पुण्य अंगा ।।**

अशी अवस्था प्राप्त होण्यासाठी कमळा सारखे जीवन जगणे आवश्यक आहे.

हा विषय आणखी समजण्यासाठी संत तुकारामांचे पुढील अभंग अत्यंत मार्गदर्शक ठरतात.

**जाणुनीनेन ते करी माझे मन**
**तुझी प्रेम खूण देऊ निया ।।**
**मग मी व्यवहारी असेन वर्तन**
**जे वीजळा आत पद्म पत्र ।।**
**ऐकूनी नाइके निंदास्तुती कानी**
**जैसा का उन्मनी योगीराज ।।**
**देखोनी न देखे प्रपंच हा दृष्टी**
**स्वप्नची या सृष्टीचे विल्या जेवी ।।**
**तुका म्हणे ऐसे झाली या वाचून**
**करणे तो अवघासी न वाटतसे ।।**

संत तुकाराम महाराज म्हणतात साधकाला आत्म ज्ञान प्राप्तीसाठी प्रथम ज्ञानाची जाणीव, conciseness गरज आहे. पण ज्ञानात 'मी' हा अहंकार आडवा येतो. संत ज्ञानेश्वर माउली म्हणतात...

**नवल अहंकाराची गोठी**
**विशेष न लगे अज्ञानाच पाठी ।।**
**सज्ञानाचे झोंबे कंठी ।।**
**नाना संकटी नाचवी ।।**

..Madam Blavatsky सुद्धा The Voice of the Silence मध्ये हेच सांगतात...

In it thy soul will find blossoms of life,but under every flower a serpent coiled..

सुगंधी फुलांच्या झाडाला सापाचे वेटोळे असते . त्या प्रमाणे जिथे ज्ञान तिथे अहंकार आहेच. अहंकार गेल्याशिवाय मुक्ती नाही.

**अहंकार गेला । तुका म्हणे देव झाला.**
**ज्ञाना मध्ये मी आणि जे जाणायचे हा भेद राहतो.**
**ज्ञाता, ज्ञान, व ज्ञेय हि त्रीपुटी नष्ट व्हायला पाहिजे..**
**सांडिली त्रिपुटी दीप उजळला घटी.**

म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात देवा मी ज्ञान मिळवलं पण तूझे प्रेम देऊन आता अज्ञानी कर. अहंकार जाण्यासाठी जाणोनीने न तेव्हा वे लागते. इथे आता भक्तीची गरज आहे . यालाच ज्ञानोत्तर भक्ती म्हणतात. ईश्वराला जाणंल्या शिवाय भक्ती होत नाही. संत तुकाराम म्हणतात -

**आता मी संसारात राहून ही त्याचे गुणदोष / लिंपन मला नाही**
**ज्या प्रमाणे कमळाचे फूल चिखलात / पाण्यात राहून अंगाला पाणी, चिखल लागू देत नाही.**

**आता मी कमळ पुष्पा प्रमाणे झालो आहे.**
**प्रथम ज्ञान, नंतर भक्ती आणि कर्म**
**एकोणी नायके निंदा स्तुती कानी**
**जैसा का उन्मनी योगीराज ।।**

ज्या प्रमाणे योगी आपल्या उन्मनी अवस्थेत मग्न असतो त्याप्रमाणे साधक कोणाची निंदा व्यवहारात एकूनही न एकल्यासारखे करतो. कारण निंदा ही पापाची जननी आहे.

संत ज्ञानेश्वर माउली म्हणतात –

**आशा जैसी दुखाते**
**व्याली निंदा दुरिते ।।**
**चुकीचे कर्म पुनर्जन्मला कारणीभूत होते.**
**उचित कर्मे आधवी तु वा आचरोनी मज अर्पावी ..**

खरा साधक सामान्य माणसा प्रमाणे प्रपंचात वावरतो / दृष्टीने सर्व पाहतो पाहून ही तो न पाहण्यासारखे वागतो. ज्याप्रमाणे स्वप्नात आपल्याला वेगळ्या सृष्टीचा भास होतो. जागे झाल्यावर ते काहीच नसते अगदी त्याप्रमाणे खऱ्या साधकाला हा प्रपंच स्वप्नवत वाटतो.

शेवटी संत तुकाराम महाराज म्हणतात वरील प्रमाणे साधकाची वर्तणूक असेल तर असा साधक जन्म – मरणा पासून मुक्त होतो.

वरील प्रमाणे ज्ञान भक्ती व कर्म याची परिपूर्णता नसेल तर त्याने घेतलेले कष्ट हा एक प्रकारे आभास होय.

त्याचा काही ही फायदा नाही. यालाच पूर्ण योग म्हणतात. जो संतांनी, HPB नी साधला होता.

व्हाईट लोटस डे साजरा करण्या मागे सुद्धा हाच उद्देश आहे.

## विनम्र आवाहन

विश्वबंधुत्वाचा पुढील अंक जुलै ते सप्टेंबर २०२४ दरम्यान प्रसिद्ध करण्याचा मानस आहे, तरी सदर अंकासाठी लेख, लॉज वार्ता छायाचित्रांसह, टी.ओ.एस. कार्यक्रमांची माहिती इत्यादी आगस्ट अखेर पर्यंत पुढीलपैकी कोणत्याही एका माध्यमाद्वारे पाठवावे.

व्हॉटस्अप – ॲड. श्री. संजय पोटे, ७७४४९१०७८७
डॉ. श्रीकांत उखळकर, ७०८३९४५७९९

ई–मेल – sanjaypotey@gmail.com
shhrikantukhalkar@gmail.com

डाक – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन
९१८, शिवाजी नगर, गणेशवाडी,
डेक्कन जिमखाना, पुणे–४११००४
डॉ. श्रीकांत उखळकर
४, माता वैष्णवी अपार्टमेंट
ॲड. मुखर्जी बंगल्याजवळ,
राऊतवाडी, अकोला. ४४४००५

विश्वबंधुत्वासाठी लेख, वार्ता इत्यादी मजकूर मराठीतच पाठवावा, अंकामध्ये अपवादानेच एखादा लेख इंग्रजी भाषेत असू शकेल.

# सेवाकार्याचे चार आधार

**डॉ. श्रीकांत उखळकर, अकोला**

थिओसॉफीचे केवळ तत्त्वज्ञानात्मक नव्हे तर जीवनात्मक अधिष्ठान सेवा हेच आहे. थिऑसॉफिकल सोसायटीच्या तीन उद्दिष्टांपैकी प्रथम उद्दिष्ट सेवाभावालाच अधोरेखित करते.

**जात, धर्म, लिंग व वर्ण हे भेद न करता मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जीवंत केन्द्र बनविणे.**

मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जीवंत केन्द्र सेवाभावाशिवाय कसे बनविता येईल? सेवेच्या पायावर किंबहूना सेवेच्या माध्यमातूनच मानवाला मानवाशी व सृष्टीतील सर्व जीवांशी जोडता येते.

थिऑसॉफीकल सोसायटीच्या ध्येयविधानातही हाच अर्थ अभिप्रेत आहे.

Mission Statement

To serve humanity by cultivating an everdeepening understanding and realisation of the Ageless wisdom, spiritual self transformation and the unity of all life.

मानवतेची अशी सेवा की ज्यामुळे कालातीत प्रज्ञानाची, आध्यात्मिक आत्मपरिवर्तनाची आणि समग्र जीवनात एकत्वाची सतत सखोल होत जाणारी समज व अनुभूतीची जोपासना होत जाईल.

(अनुवाद बंधू वसंतराव धारस्कर, नागपूर)

आध्यात्मिक आचरणात हेतूच मानवासह सर्व जीवांची सेवा आहे. महायान बौद्ध शाखेच्या विचारतत्त्वानुसार 'मी सर्व जीवांच्या सेवेसाठी, आनंदासाठी, फायद्यासाठी व उत्कर्षासाठी आध्यात्मिक आचरण करीत आहे. आध्यात्मिक शक्तीचा अभ्यास मी स्वत:ला इतरांची सेवा करण्यासाठी व सर्वांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी पात्र होण्यासाठी करीत आहे.'

सांप्रत काळात संपूर्ण जगातच मानवतावादी सेवाकार्यात सक्रिय असणाऱ्या अनेक संस्था आहेत. आपापल्या कार्यक्षेत्रात अशा संस्था प्रामाणिकपणे कार्य करतांना दिसतात. मात्र त्या सेवाकार्यातून विश्वबंधुत्वाच्या धारणेचा अंगिकार झालेला दिसून येत नाही. किंबहूना झाला तरी तो अल्पकाळ टिकतो. कोरोनाच्या वैश्विक लाटेमध्ये परस्परांना आधार देण्याची, आवश्यक ती मदत वा सेवा देण्यासाठी सर्वच देशांमध्ये तत्परता दिसून आली. विश्वबंधुत्वाच्या नात्याची नव्याने निर्माण झालेली संरचना कायम राहील असे वाटले होते. तथापि कोरोनाच्या संकटातून बाहेर पडत नाहीत तोच देशा-देशांमध्ये वाद, स्पर्धा, युद्ध व संघर्ष अशी परिस्थिती पुन: प्रस्थापित झाली. कोरोना काळातील मानवतावाद पुढे कसा विरला?

यावरुन असेही म्हणता येईल की, एखाद्या वैश्विक मानवी अस्तित्वालाच धोका निर्माण करणाऱ्या मानवी वा नैसर्गिक संकटात मानवता विश्वबंधुत्व व जागतिक सलोखा व शांतता ह्या तत्वानुकूल सेवाभाव अविष्कृत आचरण घडते परंतु ते कायम टिकाऊ नसते.

सेवाभावाच्या माध्यमातून विश्वबंधुत्व आकाराला न येण्याची चार कारणे संभवतात -

१) सेवाकार्याला आध्यात्मिक बैठक नसणे.

२) एखाद्या परिस्थितीमुळे आलेली सेवाकार्याची उथळ व अनिवार्य भावना.

३) स्वार्थप्रेरोत सेवाकार्य आणि

४) सेवाकार्यातील व्यावहारिकता

परिणामी सेवाकार्याचा प्रसार तर दिसतोय पण त्यातून इच्छित फलनिष्पत्ती साध्य होत असलेली दिसून येत नाही. ती दिसून येण्यासाठी किंवा साध्य होण्यासाठी सेवा ही एक जीवन पद्धती होणे आवश्यक आहे.

सेवाकार्याची व सेवाभावाची धारणा अंतकरणात निर्माण होईल तेव्हा सेवा ही जीवन पद्धती आहे असे म्हणता

येईल.

सेवाकार्याला स्वरुपात येण्यासाठी मानवी अंत:करणात जी मूल्ये असावी लागतील ती म्हणजे.

१) करुणा Compassion

२) समत्वभाव Equalness/Equaninity

३) कृतज्ञता Gratitude

४) क्षमाभाव Forgiveness

करुणा- 'In the voice of the silence" HPB नी म्हटले आहे की Compassion in no attribute. It in law of the Laws. HPB च्या मते करुणा म्हणजे शाश्वत प्रेमाचा कायदा (शब्द) आहे.

केवळ सहानुभूती म्हणजे करुणा नव्हे, तर करुणेचा खरा अर्थ समानुभूती आहे. एखाद्या व्यक्तीच्या जीवनाच्या कष्ट, वेदना, दु:ख यांची अनुभूतीच्या स्तरावर जाणीव घेऊन कष्ट, वेदना, दु:ख इत्यादी दूर करण्यासाठी केलेला मदतीचा प्रामाणिक प्रयत्न म्हणजे करुणा म्हणता येईल.

करुणा म्हणजे दया देखील नव्हे. दया म्हणजे देण्याचा अधिकार, म्हणून दया दाखविणारा किंवा करणारा मोठा ठरतो. दया करण्यामध्ये दु:खी, कष्टी जीवाला त्यातून बाहेर काढून मोकळे करण्याचा भाग नसतो. करुणेमध्ये तो असतो. दया गुण आहे. तर करुणा भाव आहे.

करुणा परेपासून प्रेरीत असते. सेवा जी करुणा भावातून घडून येते तिथे स्वाभाविकता असते. कृत्रिमपणा नसतो. थिऑसॉफीच्या सेवेच्या संकल्पनेत करुणामय कृती वा व्यवहार अभिप्रेत आहे.

**समत्वभाव :**

समत्व अथवा समताभाव सेवाकार्याचा मूल्यवाद आधार आहे. सर्व जीव एकच आहेत ह्या भावनेने सर्वांप्रति समभाव सेवाकार्यासाठी प्रेरणा आहे. 'मी कुणाची सेवा करतोय किंवा सेवा देतो आहे, म्हणजे सर्वांठायी वास करणाऱ्या ईश्वराचीच सेवा करत आहे त्याचप्रमाणे मी स्वत:चीच सेवा करत आहे' हा भाव सेवाकार्याला प्रवृत्त करतो.

समत्व म्हणजे विषमत्वाचा अभाव. समत्व म्हणजे समतोलता. समत्वभाव अंतर्बाह्य आहे. देहातही सर्व आवश्यक घटकांचा समतोल, मनाच्या, अंत:करणाच्या स्तरावरही सर्व भाव-भावनांचा चांगला-वाईट ह्या भेदापलिकडे जाऊन विकार म्हणजे अंतर्गत समत्व.

एकत्वभावातून उभं राहतो तो समत्वभाव. सर्व एक आहेत, सर्वांना चालविणारी चैतन्यशक्ती एकच आहे या जाणीवेतून सर्वच समान आहेत याची ओळख पटते. म्हणून या आधारावर जेव्हा सेवाकार्य घडते ते स्वउपकारकच असते. असे सेवाकार्य करतांना कर्तेपणाची भुमिका उभी न राहता समर्पणाची भूमिका उभी राहते.

**कृतज्ञता :**

सृष्टीतील प्रत्येक चर-अचर घटक परस्परांवर परिणामकारक व अवलंबून आहेत. ते परस्परांना सहाय्यक व पुरकदेखील आहेत.

यासंबंधी थोडेसे निरिक्षण केले तर सहज लक्षात येते की, या सृष्टीतील प्रत्येक जीवमात्र व सर्व पंचभूतात्मक घटक सेवावृत्ती घेऊन आहेत. सृष्टीचा कर्ताही स्वत: सेवावृत्ती धारण करुनच आहे.

प्रत्येक जीवाच्या निर्मिती व जडणघडणीत, मग ते वेलीवरचे फुल असो, एखादा किटक वा मनूष्य, सृष्टीतील इतर घटकांच्या सेवेचा वाटा आहे. सृष्टीचे अस्तित्व कायम राहण्यासाठीही सृष्टीतील सर्व जीव कळत नकळत सेवावृत्तीने कार्यरत असलेले दिसतात.

कृतज्ञता म्हणजे इतरांनी माझ्यासाठी केलेल्या सेवेविषयीची जाणीव व्यक्त करणे आहे. ही जाणीव केवळ

भाव असून चालणार नाही तर ती प्रत्यक्ष कृतीतून याचा आविष्कार व्हायला पाहीजे. थिऑसॉफीच्या विचारसरणीनुसार कृतज्ञता केवळ शाब्दीक नसून ती कृतियुक्त आहे. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केलेली कृति सेवाकार्यच असते. कृतज्ञतायुक्त कृति म्हणजे मला इतरांकडून जे प्राप्त झाले आहे त्याची सेवेतून केलेली परतफेड होय.

थिऑसॉफीमध्ये उपरोक्त चार आधारावर उभी असणारे सेवाकार्य अभिप्रेत आहे, असे शेवटी म्हणता येईल कां?

**क्षमाभाव :**

इतरांच्या चुकांबाबत त्यांना माफ न करण्याची मनोभुमिका खऱ्या सेवाकार्याच्या आड येते. याउलट क्षमा करण्यातून सेवाभाव जागृत होतो. 'क्षमा विरस्य भूषणम्!' असे म्हटले आहे. शिक्षा करण्यापेक्षा क्षमा करण्यात जास्त पुरुषार्थ असतो. जेथे शिक्षा करणारा मानव आहे तेथे सेवाभाव कसा असेल कारण शिक्षा हे काही सेवाकार्य असू शकत नाही.

क्षमाभाव स्वपासून प्रारंभ होतो. व्यक्ती जर स्वत:च्या चुकांबद्दल स्वत:ला क्षमा करु शकत असेल तरच ती इतरांना क्षमा करु शकेल. म्हणून प्रथमत: स्वत:ला क्षमा केल्याशिवाय स्वची सेवा घडू शकत नाही.

'मी सर्वांची क्षमा मागतो व सर्वांना क्षमा करतो' या भुमिकेत क्षमा मागण्यात कमीपणा नाही आणि इतरांना क्षमा करण्यातही मोठेपणाचा आव नाही. क्षमाभावाशिवाय सेवा घडू शकत नाही. आजारी व्यक्तीला त्याच्या चुकीच्या सवयीबद्दल क्षमा केल्याशिवाय त्याची सुश्रृषा करता येणार नाही, केली तर त्याची फलनिष्पत्ती साध्य होणार नाही.

********

**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन, पुणे**

## I. थिऑसॉफी म्हणजे काय

१. थिऑसॉफी हा जीवनाचा एक मार्ग आहे.
२. हे जिवनाचे खरे शुद्ध स्वरूप उलगडण्यावर आणि मुक्ततेवर भर देते.
३. वैयक्तिक चेतनेपासून ते वैश्विक चेतनेपर्यंत जाते.
४. हा एक जिवंत प्रवाह आहे ज्यामध्ये प्रत्येकजण योगदान देत आहे.
५. ही संपूर्ण प्रणाली नाही ; सेंद्रिय आणि आध्यात्मिक असल्याने ते एक निश्चित भौमितिक नमुना असू शकत नाही की ज्याचे वर्णन केले जाऊ शकते.
६. हे केवळ सत्य नसून सत्याचा शोध आहे.
७. थिऑसॉफी ही एक दयाळू जीवन पद्धती आहे जी जगली पाहिजे.
८. तिने धर्माचे स्थान घेऊ नये.

ही विधाने जगभरातील थिऑसॉफिकल सोसायटीच्या १४ जुलै ते २२ जुलै १९६६ या कालावधीत साल्सबर्ग (ऑस्ट्रिया) येथे थिऑसॉफिकल सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय काँग्रेसचा अधिवेशनात नेत्यांनी त्यांच्या व्याख्यानात आणि भाषणात केली.

** व्दारा प्रकाशित – डॉ. बी.आर. मुल्लिक, आग्रा (३१ जुलै १९६६)

** पुनरुत्पादित – अरुण पलकृत, पुणे व्दारा प्रचलित. (१७ नोव्हेंबर २०२२ थिऑसॉफिकल सोसायटी स्थापना दिवसाच्या निमित्ताने प्रकाशित)

**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन पुणे व थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्विस,**
**अकोला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने अड्यार डे निमित्त निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त निबंध**

# अध्यात्माचे वैज्ञानिक स्वरुप

सध्याचं युग हे आधुनिक तंत्रज्ञानाचं युग आहे. माहिती व तंत्रज्ञानातील अफाट प्रगतीमुळे मनुष्याचे जीवनमान पूर्णपणे बदलून गेले आहे. दैनंदिन जीवनात पदोपदी आपण विज्ञान व तंत्रज्ञानाचा अनुभव घेतोय. आधुनिक तर मनुष्याला अज्ञान असणाऱ्या असंख्य गोष्टींवर अथक संशोधन करुन निसर्गातील अनेक अनाकलनिय पैलूंवर प्रकाश टाकला आहे. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आता मनुष्याला अवगत झाल्या आहेत. मानवीय जनुकांच्या निर्मितीपासून ते अगदी अथांग पसरलेल्या अवकाशातील असंख्य आकाशगंगे संबंधी अनेक प्रश्नांची उकल आपल्याला होऊ लागली आहे. एकूणच मानव समाजाच्या ज्ञानकक्षा प्रचंड रुंदावल्या आहेत. या रुंदावलेल्या कक्षेत अध्यात्म नेमके कुठे बसते? विज्ञानाच्या कसोटीवर त्याचे परीक्षण आपल्याला करता येईल का?

बुद्धी व मन ही मानवाला लाभलेली निसर्गदत्त देणगी आहे. ज्याच्या जोरावर माणसाने आपली प्रगती साधली आहे. सभोवताली सृष्टीत घडणाऱ्या विविध घटनांचा अर्थबोध करुन घेण्याची धडपड तो सदैव करत असतो. या बुद्धीच्या जोरावर मानवाने 'असे का होते?' या मूलभूत प्रश्नाचे उत्तर शोधण्यास प्रारंभ केला आणि त्यातून विविध शास्त्रांचा उगम झाला. ज्ञानशाखांची निर्मिती आणि विकास झाला. अनेक गोष्टींबाबत तत्वचिंतन सुरु झाले. ज्यातून निरनिराळ्या तत्वविचारांचा उदय झाला. सभोवतालच्या सृष्टीत घडणाऱ्या घटनांचा सूक्ष्म विचार होऊ लागला आणि त्यातून अनेक रहस्य उलगडली गेली. 'असे का होते?' या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रक्रियेलाच आपण विवेचन असे म्हणतो. भारतीय तत्वविचारानुसार या विवेचनाचे मुख्यत: तीन स्तर होतात. त्याची माहिती घेतल्यास आपल्याला विज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील संबंध लक्षात येण्यास मदत होते.

जर सृष्टीतील नानाविध पदार्थांच्या मुळाशी एकच अव्यक्त परमतत्व (परमात्मा) आहे, असे ज्याला समजले, ते 'ज्ञान', तर या एकाच मूलभूत तत्वापासून सृष्टीतील अनेक भिन्न भिन्न पदार्थांची निर्मिती कशी झाली, असे ज्याला समजले ते म्हणजे 'विज्ञान'. विज्ञान आणि अध्यात्म हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु दोन्ही मात्र चांगल्या व संतुष्ट जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतात. दोन्ही खूप वेगळ्या संकल्पना आहेत तरी सुद्धा एक दुसऱ्याशी संघर्ष करतात. विज्ञान तथ्य आणि तर्क या गोष्टींवर आधारित आहे. तर अध्यात्म विश्वास आणि अनुभवांवर आधारित आहे. बटण दाबले की दिवा लागतो हा विश्वास म्हणजे विज्ञान. विज्ञानाचा हा अगदी साधा आणि सोपा आशय आहे. अध्यात्माचा एक मात्र निकष म्हणजे ज्यामुळे प्रेम, परोपकार, करुणा, बंधुता, सहनशीलता अशा मूल्यांची जोपासना होते ते खरे अध्यात्म. विविध आजारावर विज्ञानाने केलेली मात भौतिक गरजा भागविण्यासाठी निर्माण केलेल्या विविध वस्तू विश्वाच्या रचनेचे उलगडत ठेवलेले रहस्य यातून सौदर्यं, कला व समृद्धी यांचा लाभ आपणास होत आहे. तथाकथीत अध्यात्मवाद्यांचा आत्मा ज्या शरीरात वास करतो त्या शरीराच्या अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या मूलभूत गरजा भागविणे हे एक प्रकारचे अध्यात्माचेच कार्य होय.

विज्ञान म्हणते ज्ञान प्राप्ती होऊ शकते, तर अध्यात्म म्हणते आपल्या जवळचे पहिल्या पासूनचज्ञात आहे, फक्त ते शोधावे लागते. विज्ञान काही प्रश्नांची उत्तर देण्यास असमर्थ होऊ शकते तर काही प्रश्नांची उत्तरे शोधत आहे. परंतु अध्यात्मात पहलेच प्रश्नांची श्रृंखला अंतर्भूत आहे. विज्ञान अध्यात्माला समजू शकत नाही तर अध्यात्म विज्ञानाचे कारण होते. विज्ञान वस्तूतंत्र आहे. विज्ञानाचा संबंध वस्तू स्वरुपाशी आहे. एंद्रिय अनुभवाचे व्यवस्थीकरण हे विज्ञानाचे कार्यक्षेत्र आहे.

जीवन सुरळीत व निरामय होण्याविषयी तीन प्रकारच्या व्यवस्था ईश्वर निर्मित सृष्टीत आहे.

१) आध्यात्मिक

२) अधिदैविक

३) अधिभौतिक

विज्ञान म्हणजे व्यावहारिक ज्ञान. अगोदर विज्ञान समजले पाहिजे नाहीतर ज्ञान होते वेळी बुद्धीची दृष्टीच थांबते. अर्थातच अध्यात्मिक प्रगती थांबते.

अधिभौतिक म्हणजे वैज्ञानिक कक्षेतील वातावरण अध्यात्मिक कक्षेपर्यंत उंचावण्यास समर्थ होते. 'मनुष्यांणां सहस्त्रेषू काश्चित यतति' व त्यातही 'कश्चित मां वेत्ति' म्हणजे अधिभौतिक अर्थात विज्ञान कक्षेतील विकार क्षेत्र ओलांडून उच्च क्षेत्रात जाऊ पाहणारा हजारात एखादा व त्या एखाद्यातून परमात्म क्षेत्र अर्थात् अध्यात्म कक्षेतील वातावरणात पोहचणारी व्यक्ती सुद्धा एखादीच असते. वैयक्तिक सुख दु:ख कक्षा म्हणजे भौतिक वैज्ञानिक कक्षा ओलांडल्यानंतर मनुष्याचा खरा प्रवास सुरु होतो. तो अध्यात्मिक क्षेत्रात प्रवास करु शकतो.

ग्रहणे कशी लागतात व कशामुळे लागतात याबद्दल म्हटले तर हा वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. मात्र ग्रहणाचे विपरित परिणाम मानवावर होऊ नये त्यासाठी अध्यात्मिक क्षेत्रातून त्याच्यावर उपाय केले जातात. विज्ञानाची अध्यात्माशी अशी सांगड घातली जाते. अध्यात्म म्हणजे साधं, सोपं, सरळ आणि निर्मळ असणं, दिसणं आणि वागणं अध्यात्म म्हणजे फक्त पूजा, अर्चना, प्रार्थना आणि भक्ती या प्रमाणेच आपली प्रत्येक कृती असणे. अध्यात्म म्हणजे राष्ट्रपुरुष आणि राष्ट्रीय संतांचं सदैव स्मरण असणे.

अध्यात्म या संबोधात आद्य + आत्मन् अशी दोन पदे आलेली दिसतात. यातील 'आद्य' म्हणजे आधीचा व 'आत्मन' म्हणजे आत्मा अध्यात्म या शब्दाची फोड अधि म्हणजे शरीर व त्यात वास असणाऱ्याचे अयन करणे म्हणजे शिकणे ते अध्यात्म. अध्यात्म म्हणजे आपल्या आत्म्याचे ध्यान करणे. विज्ञान म्हणजे पुराव्यावर आधारित पद्धतशीर कार्यपद्धतीने अनुसरण करुन नैसर्गिक आणि सामाजिक जगाचे ज्ञान आणि समजून घेण्याचा पाठपुरावा आणि वापर.

आपण यापूर्वीच पाहिले आहे की भारतीय तत्वविचारानुसार विवेचनाचे मुख्यत: तीन स्तर होतात. त्याची माहिती घेतल्यास आपल्याला विज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील संबंध लक्षात येण्यास मदत होईल. हे तीन स्तर समजून घेण्यासाठी तीन प्रकार सांगता येतील.

१) आधिभौतिक विवेचन

२) अधिदैविक विवेचन

३) अध्यात्मिक विवेचन

**१) अधिभौतिक विवेचन**

भौतिक सृष्टीतील पदार्थ आपल्या इंद्रियांना जसे अवगत होतात. त्यानुसार त्यांचा विचार अथवा अभ्यास करणे म्हणजे अधिभौतिक विवेचन. सूर्य आपल्याला डोळ्यांनी दिसतो. त्याचा प्रकाश आपल्या डोळ्यांना, तर उष्णता त्वचेला कळते. संबंधित इंद्रियांना त्याची जाणीव झाल्यावर आपल्या विचार प्रक्रियेत प्रारंभ होतो. मग आपण सूर्याचा आकार त्याचे वस्तुमान, तापमान तेथे होणाऱ्या रासायनिक प्रक्रिया, सूर्याचे आकाशातील स्थान, गती, पृथ्वीपासून अंतर इत्यादी भौतिक घटकांचा अभ्यास करतो आणि 'असे का'? याचे उत्तर मिळवतो हे झाले अधिभौतिक विवेचन.

**२) अधिदैविक विवेचन**

आपल्या इंद्रियांना अवगत होणाऱ्या वस्तुंच्या मुळाशी एखादे अन्य तत्व असून ते भौतिकतेच्या पलीकडील आहे आणि एखादी देवता ते अचित्य तत्त्व संचालित करत असते असे मानणे म्हणजे अधिदैविक विवेचन सूर्य उगवतो, तो आपल्याला प्रकाश व उष्णता देतो याला सूर्याचे वस्तुमान, आकार, रासायनिक प्रक्रिया अशा भौतिक घटकांबरोबरच त्याच्या पलीकडे असणारी एखादी अनाकलनीय शक्ती कार्यरत आहे. असा विचार करुन त्या शक्तीला सूर्याला कार्यान्वित करणारी देवता मानणे, म्हणजे अधिदैविक विवेचन.

**३) अध्यात्मिक विवेचन**

जड सृष्टीत दिसणाऱ्या सर्व भिन्न भिन्न पदार्थांच्या ठायी एकच अचित्य शक्ती आहे, असे म्हणणे म्हणजे अध्यात्मिक विवेचन अर्थात, आपल्याकडे रुढ असणारा वेद व उपनिषदातील विचार सूर्य आपल्याला डोळ्यांनी दिसतो, त्याची उष्णता त्वचेला जाणवते. म्हणजेच काय तर सूर्याचे अस्तित्व आपल्याला आपल्या ज्ञानेंद्रियामुळे कळते. परंतु, या इंद्रियांच्या पार अर्थात इंद्रियांतील असे एक तत्त्व असून हे तत्त्व सर्वत्र भरले आहे आणि हा इंद्रियांना भासणारा सूर्य व अन्य सृष्टी हे त्या तत्त्वांचेच एक रुप आहे, असा विचार करणे म्हणजे अध्यात्मिक विवेचन अध्यात्मिक विवेचन इंद्रियातील तत्त्वांचा विचार करते. त्यामुळे अशा तत्त्वाचे मोजमाप अधिभौतिक उपकरणांनी करणे शक्य नाही हाच फरक आहे. विज्ञान व अध्यात्म यातील विज्ञान आणि अध्यात्म या दोन वेगळ्या मिती (dimensians) आहेत. वैज्ञानिक उपकरणांनी अध्यात्माचे मोजमाप शक्य नाही. आणि मोजता येत नाही म्हणून त्याचे अस्तित्व नाकारणे तर्कसंगत ठरणार नाही. विज्ञान हे इंद्रियांच्या अनुभवावर तर अध्यात्म हे इंद्रियातील अनुभूतीवर सिद्ध होते.

भगवद्‌गीतेत ज्ञान आणि विज्ञान यांची सुंदर व्याख्या आढळते. जड सृष्टीतील नानाविध पदार्थाच्या मुळाशी एकच अव्यक्त परम तत्त्व (परमात्मा) आहे. असे ज्याने समजते ते 'ज्ञान' तर या एकाच मुलभूत तत्त्वापासून सृष्टीतील अनेक भिन्न भिन्न पदार्थांची निर्मिती कशी झाली असे ज्याने समजते ते म्हणजे विज्ञान ज्यात जीवशास्त्र व भौतिकशास्त्राचा समावेश आहे. म्हणजेच आपण एक मध्यबिंदू आहोत. एकात्मतेकडून भिन्नतेकडे प्रवास केल्यास आपण वैज्ञानिक प्रगती साधू शकतो. त्या उलट भिन्नतेकडून एकात्मतेकडे प्रवास केल्यास अध्यात्मिक प्रगती साधू शकतो. विज्ञान मनुष्याला बहिर्मुख (exfrovert) म्हणजेच स्वत:पेक्षा बाह्य जगाचाच अधिक विचार करणारी व्यक्ती बनवते. तर अध्यात्म अंतर्मुख (introvert) बनवते. एक अंतर्मुख व्यक्ती अशी व्यक्ती आहे जी अधिक आत्मनिरिक्षण करते, याचा अर्थ ते बाहेर जाणे किंवा सामाजिक असण्याऐवजी त्यांच्या विचारावर आणि भावनांवर लक्ष केंद्रित करतात.

अंतर्मुख लोकांना सहसा लाजाळू किंवा अलिप्त लोक समजले जाते, पण खरं तर हे लोक बहिर्मुख लोकांसारखेच करिष्माई असण्यास सक्षम असतात. अंतर्मुख व्यक्ती शांत असतात. ते लोकांचा द्वेष करत नाहीत. त्यांना गप्पाटप्पा आणि मूर्खपणा आवडत नाही. या व्यक्तींचा 'सोलो' एक्टिविटी' वर जास्त भर असतो.

वैज्ञानिक प्रगतीकडे बदललेला जीवनशैलीचे विपरित परिणाम हळूहळू दृश्यरुप होत आहेत. जीवनात अस्थैर्य वाढीस लागले आहे. अशा समयी आपण कोणती वाट निवडायची आणि प्रगती साधायची याचा प्रत्येकाने अंतर्मुख होऊन विचार करणे, हीच खरी काळाची गरज बनली आहे.

– गजानन गुणवंतराव देशपांडे, अकोला.

# चला पुन्हा विश्व गुरु होऊ या!

**प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे**

जगातील सर्वात मोठया लोकशाहीचा मान मिरविणाऱ्या आपल्या भारत देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी पाहिले होते. हे स्वप्न ज्यांच्या भरवशावर पाहिले होते ते म्हणजे युवक. या देशातील तरुणाई देशाला महासत्तेच्या शिखरावर नेईल हा आत्मविश्वास अब्दुल कलाम यांना होता. २०२० हे वर्ष यासाठी निश्चीत केले होते. कलाम केवळ स्वप्न देवून थांबले नाही तर त्यांनी महासत्ता बनण्याची पायाभरणी देखील केली होती. कलामांचे स्वप्न हे संपूर्ण देशाचे स्वप्न बनले आणि संपूर्ण देशवासीयांनी झपाटल्यागत काम सुरु केले. ध्येय आता अंतीम टप्यात होते. भारताची घोडदौड रोखण्याची ताकद कोणातच नव्हती. २०२० मध्ये आपण कलामांचे स्वप्न पुर्ण करु असे वाटतही होते. परंतु २०१९ मध्ये कोरोनारुपी महाभयंकर अडथळा आपल्या घोडदौडीच्या आड आला आणि आपले स्वप्न भंगले. २०२० आणि २०२१ असे दोन वर्ष आपण कोरोनाशी झुंजलो आहे. २०२२ उजाडले तरी कोरोना जाण्याचे नाव घेत नव्हते. आपल्या प्रगतीला आणि प्रयत्नांना या कोरोनाने अडथळा निर्माण केला आहे. आपल्या मेहनतीवर कोरोनाने पाणी फेरले आहे. महासत्ता तर दूर आपल्या अस्तित्वावरच या कोरोनाने घाला घातला आहे. केवळ भारतच नाही तर जे पुर्वीपासून महासत्ता होते असे देश देखील या कोरोनामुळे कोसळले. त्यांची महासत्तापदे डळमळीत झाली. सर्वांगीणदृष्टीने ते हतबल झाले. मग अशावेळी महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारताची सोय काय विचारता? परंतु आपला आशावाद जिवंत होता कारण आपल्याकडे असलेला अध्यात्माचा वारसा. अध्यात्माने आपल्याला कुठल्याही संकटात सुदृढ कसे राहायचे हे शिकविले आहे. भगवद्गीता याचे उत्तम उदाहरण आहे. अर्जुनाला अत्यंत विपरीत आणि अटीतटीच्या प्रसंगी भगवान श्रीकृष्णांनी गीतेचे ज्ञान दिले. आमच्या रामायण, महाभारत, वेद, उपनिषद व पुराणांमध्ये अनेक मार्गदर्शक तत्त्वे आम्हाला जीवनातील संकटसमयी कसे लढायचे याचे मार्गदर्शन करतात. पिढी दर पिढी हा वारसा आमच्याकडे चालत आलेला आहे. आणि त्यामुळेच आम्ही कोरोनाच्या संकटातून बाहेर पडलो आणि आत्मनिर्भर भारत बनण्याकडे वाटचाल सुरु केली आहे.

महासत्ता होताना आपल्याला सर्वात आधी कोणकोणत्या क्षेत्रात विकासाच्या संधी शोधायच्या आहेत त्याचा विचार करावा लागणार आहे. प्रामुख्याने व्यापार, शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा, साहित्य आणि संस्कृती, कृषी या क्षेत्रांचा विचार आपल्याला महासत्ता होताना करावा लागतो. या सर्वच क्षेत्रांचा विचार केला असता असे लक्षात येते की कधी काळी या क्षेत्रांमध्ये आपण आघडीवरच होतो. परंतु मधल्या काळात मोठया प्रमाणात परकीय आक्रमणांनी आमची सर्वक्षेत्रात पिछेहाट झाली. ही झालेली पिछेहाट आम्ही आपल्या कर्तृत्वावर भरुन काढली. अनेक क्षेत्रात आम्ही आमच्या देशाचे कर्तृत्व सिद्ध केले. आम्हाला मागे खेचण्याचा प्रयत्न अनेकवेळा झाला परंतु आम्ही सातत्याने पुढे पुढे जातच राहिलो. एखाद्या व्यक्तीने मागे खेचले तर त्याचा मुकाबला आम्ही नेटाने केला व आम्हाला खेचणाऱ्यांना अनेकवेळा पराभूत केले. परंतु २०२० पासून कोरोनारुपी विषाणू आम्हाला मागे खेचत आहे. त्याच्याशी देखील आम्ही नेटाने लढत आहोत. मात्र या कोरोनाने आम्हाला हतबल केले, आम्हाला अनेक वर्ष मागे नेले. कलामांच्या स्वप्नांना कोरोनाने सुरुंग लावला. सर्व बंद असल्यामुळे आर्थिक नुकसान तर मोठे झालेच सोबतच सामाजिक नुकसान देखील आम्हाला मोठ्या प्रमाणात सहन करावे लागले. आर्थिक नुकसान एकेवळ आम्ही भरुन काढू परंतु सामाजिक नुकसान भरुन काढणे एवढे सोपे नाही. परंतु आम्ही आता कोरोना संकटातून बाहेर पडलो आहे. आम्ही कोरोना विरुद्ध लढण्यासाठी लस तयार केली. संपूर्ण देशात लसीकरण केले. जगातल्या अनेक देशांना देखील आम्ही लस पुरविली. आमच्या धर्मशास्त्रांनीच आम्हाला

अडचणीत सापडलेल्यांना मदतीचा हात द्या, हे शिकविले आहे. प्रसंगी आपण अर्ध उपाशी राहू परंतु गरजू पर्यंत अर्धी भाकर पोहोचवा हे आम्हाला आमचे अध्यात्म शिकविते. ते आमच्या रक्तात भिनल्या गेल्यामुळेच आम्ही हतबल झालेल्या शेकडो देशांना मदतीचा हात दिला.

कोरोनामुळे झालेले सर्व क्षेत्रातील नुकसान आम्ही भरुन काढू त्यादृष्टीने आम्ही काम देखील सुरु केले. व्यापार नव्याने उभा राहत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आम्ही स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गावर आहोत. क्रीडा क्षेत्रात देखील आम्ही दबदबा निर्माण केला असल्याचे नुकत्याच झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत आम्ही सिद्ध केले आहे. कृषी क्षेत्रातही आमची प्रगती नेत्रदीपक अशी आहे. विक्रमी उत्पन्न आम्ही अनेक पिकांचे घेत आहोत. जागतिक विषयांना कवेत घेणारे साहित्य आमचे साहित्यिक निर्माण करीत आहेत. अशा सर्वच क्षेत्रात आमची घोडदौड सुरु असतांना एक क्षेत्र मात्र आमच्यासाठी चिंता करण्यासारखे आहे. आणि ते क्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र. जेव्हापासून कोरोना सुरु झाला तेव्हापासून शिक्षणाचे बारा वाजले आहेत. शाळा आणि महाविद्यालये बंद असल्यामुळे शिक्षणरुपी चक्राची गती थांबली आहे. सगळया विकासाच्या ज्या परिभाषा आहेत त्यांचे मुळ शिक्षणात आहेत. शिक्षणाच्या माध्यमातूनच इच्छित गोष्ट प्राप्त करता येते हे त्रिवार सत्य आहे. महासत्ता बनण्यासाठी देखील शिक्षण क्षेत्राचे सर्वात मोठे योगदान असते. जगातील महासत्तांकडे आपण नजर टाकली तर असे लक्षात येते की या सर्व महासत्तांनी शिक्षणाच्या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. जगातील सर्वोत्तम शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे या महासत्ता असणाऱ्या देशातच आहेत. जगभरातील विद्यार्थ्यांचा ओढा या महासत्तांमधील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेण्याकडे आहे. कधी काळी असाच ओढा आमच्या देशाकडे देखील होता. तक्षक्षीला, नालंदा, विक्रमशीला यासारख्या सर्वोत्तम शैक्षणिक संस्था आमच्या देशात होत्या. या काळात आमचा देश महासत्ताच होता. सर्व जगाचे लक्ष आमच्या देशाकडे होते. जगभरातील विद्यार्थी आमच्या देशातील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासाठी आतुर असतं. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. जगातील विद्यापीठांच्या गुणवत्तेच्या रांगेत आमची विद्यापीठे भिंग लावून शोधावी लागतात. तरी देखील ती सापडत नाहीत. अशी आमची अवस्था का झाली हा संशोधनाचा

विषय आहे. कोरोनामुळे झालेली शिक्षणाची दुरावस्था हा आज आमच्या चिंतनाचा विषय आहे. कोरोनाने शाळा-महाविद्यालयांना कुलुप ठोकले. शिक्षण देणारी केंद्रच बंद झाल्यामुळे शिक्षण घेणाऱ्यांच्या पुढे मोठी समस्या निर्माण झाली. यावर उपाय म्हणून आम्ही आभासी (ऑनलाईन) पद्धतीने शिक्षण देण्याचा मार्ग शोधून काढला. परंतु हा मार्ग किती तकलादू आहे हे अवघ्या एकच वर्षात आम्हाला कळून चुकले आहे. सुरुवातीला हे खुप छान वाटले. परंतु यातील फोलपणा आता उघड होऊ लागला आहे. गुरुकुल पद्धतीने शिक्षण देणाऱ्या आमच्या देशाचा प्रवास आभासी शिक्षण पर्यंत येऊन पोहोचला आहे. शिक्षण ही दोन घटकातील प्रक्रिया आहे. हे दोन घटक म्हणजे शिक्षण देणारा आणि शिक्षण घेणारा. हे दोन घटक जर समोरासमोर नसतील तर शिक्षण ही प्रक्रिया गतीमान होऊच शकतं नाही. शिक्षक आणि विद्यार्थी एकाठिकाणी असतील त्याचवेळी उत्तम शिक्षण दिल्या जाऊ शकते हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. परंतु कोरोनामुळे शिक्षक आणि विद्यार्थी दुर झाले आहेत. दोघातील हे वाढते अंतर हाच चिंतेचा विषय बनले आहे. आम्ही संगणक आणि भ्रमणध्वनी (मोबाईल) च्या माध्यमातून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा केवळ कृत्रिम उपाय झाला. नैसर्गिकरित्या शिक्षक आणि विद्यार्थी देहाने समोरासमोर असणे आवश्यक आहे. कारण शिक्षक जेव्हा समोरासमोर शिकवितात तेव्हा ते अधिक पक्क लक्षात राहते. आभासी पद्धतीचे शिक्षण परिणामकारक ठरु शकत नाही. नाईलाज म्हणून आम्ही ही पद्धती स्वीकारली आहे. शिक्षणाचा केवळ आभास निर्माण करणे हेच काम ही पद्धती करीत आहे. प्रत्यक्षात शिक्षण देण्यात ही पद्धती कुचकामी ठरतं असल्याचे मागील दोन वर्षाच्या

अनुभवातून आपल्या लक्षात येत आहेच. एक तर आपल्या देशात अजूनही इंटरनेट सेवा सर्व गावांपर्यंत पोहचू शकलेली नाही. त्यातच जग ५-जीच्या पुढे जात असतांना आम्ही ३-जी सेवा देखील व्यवस्थीत देऊ शकलेलो नाही. नेटचा स्पीड नाही, इंटरनेटची सुविधा नाही, कॉम्प्युटर किंवा मोबाईल विकत घेऊ अशी आर्थिक क्षमता नाही अशा परिस्थितीत आम्ही कसे आभासी शिक्षण देणार? हा प्रश्न आहे. आमच्या शिक्षण व्यवस्थेवर घाला घालून आम्हाला मागास ठेवण्याचं एक मोठं षडयंत्र जागतिक पातळीवर सुरु आहे. त्यासाठीच आम्हाला आभासी दुनियेत खिळवून ठेवण्याचा कट रचल्या गेला आहे. या कटाला आम्ही हळुहळु बळी पडत आहोत. वेळीच सावध होण्याची गरज आहे. अन्यथा आम्ही कधी भरुन न निघणारे नुकसान करुन बसु.

आमचे २०२० मध्ये महासत्ता होण्याचे स्वप्न कोरानामुळे हवेत विरले. आमच्या विद्यमान पंतप्रधानांनी आता आम्हाला आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवापर्यंत देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न दिले आहे. २०४७ हे आता आपले लक्ष्य आहे. हे लक्ष्य प्राप्त करणे हेच आता आपल्या सर्वांचे उद्दिष्ट बनले पाहिजे. यासाठी युवा पिढीने पुढाकार घेण्याची गरज आहे. कारण जगातील सर्वाधिक युवा संख्या असलेला आपला देश आहे. आणि या युवा पिढीच्या भरवशावरच आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. अशावेळी युवा पिढीने देहभान विसरुन कामाला लागले पाहिजे. झपाटल्या सारखे पेटून उठावे लागेल. जिथे जिथे संधी आहे तिथे आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. आपल्याला ज्या कामात गती आहे त्या कामात निष्ठेने योगदान द्यावे तरच आपल्याला आपल्या देशाला महासत्तेचा मुकुट चढविता येईल. सर्वात आधी आम्हाला जुनी जळमटे काढून फेकावी लागतील. जुन्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, चालीरिती यांना त्यागून नवीन व पुरोगामी विचारांची कास धरावी लागेल. आमच्या संस्कृतीमधील चांगले आणि उदात्त विचार पुढे नेत नवीन विचारांची पेरणी करीत आम्हाला पुढे जावे लागणार आहे. यातूनच आपल्या देशाचा भाग्योदय होणार आहे. आपल्या हातात २५ वर्षाचा कालखंड आहे. ही २५ वर्ष आज जरी खूप वाटत असली तरी वर्ष निघून जाण्यास वेळ लागत नाही. भरभर दिवस जातात. त्यामुळे आम्हाला कंबर कसून कामाला लागावे लागणार आहे.

'चला उठा आता बांधा कमरा
वेळ न दवडा लवकर आवरा'
कर्तव्य आपले पार पाडू.
या देशाला महासत्ता बनवू'

या काव्यपंक्तीप्रमाणे आपण आपले कर्तव्य पार पाडून या देशाला महासत्ता बनविण्यासाठी कटिबद्ध होणे गरजेचे आहे. यातूनच आपल्या विकासाची वाट सुरु होणार आहे. स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षात एक संकल्प घेऊन आपण कार्यारंभ करणे समयोचित ठरेल. आपल्या भरभक्कम आणि उदारमतवादी संस्कृतीच्या बळावर आपण निश्चित महासत्ता बनू आणि विश्वगुरु बनून जगाला मार्गदर्शन करीत राहू यात काहीही शंका नाही.

*******

## श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉज, अमरावती



येथे दर रविवारी सदस्यांची आठवडी सभा व भारतसमाज पूजा घेतली जाते आणि थिऑसॉफिकल साहित्यांची माहिती दिली जाते. तसेच खालील प्रमाणे राष्ट्रीय व्याख्यात्यांचे अभ्यास वर्ग घेण्यात आलेत.

(१) दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत बंधु श्री उमाशंकर पांडे यांचा थिऑसॉफिकल ब्लूम्स् या? पुस्तकातील विविध विषयांवर अभ्यास वर्ग झाला. लॉजचे पदाधिकारी व ग्रामस्थ जवळपास ३० लोकांनी याचा लाभ घेतला. अभ्यास वर्ग चालू असतांना फेडरेशनचे अध्यक्ष श्री संजयजी पोटे व श्री एन.एन.राऊत यांनी सदिच्छा भेट दिली. लॉज तर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.

(२) दिनांक ९ ते ११ मार्च २०२४ या कालावधीत बंधु श्री बी.डी.तेंडूलकर यांचा आत्मज्ञान या विषयावर अभ्यास वर्ग झाला. लॉजचे पदाधिकारी व ग्रामस्थ जवळपास २० लोकांनी याचा लाभ घेतला.

(३) दिनांक १६ ते १८ मार्च २०२४ या कालावधीत बंधू श्री एन.एन.राऊत यांचा Seven Principles of Man (Written by Annie Besant) या विषयावर अभ्यास वर्ग झाला. लॉजचे पदाधिकारी व ग्रामस्थ जवळपास २० लोकांनी याचा लाभ घेतला.



मालेगाव (नाशिक ) परसरातील थिऑसॉफिकल सोसायटी व थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्विस ह्या संस्थांच्या कार्याचा आढावा घेणारी पुस्तिका ‘थिऑसॉफिकल कार्याचा मागोवा’ ह्या जेष्ठ थिऑसॉफिस्ट बंधू डॉ.डोळे ह्यांनी लिहिलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन मालेगाव येथे ४ मार्च रोजी सम्पन्न झाले. ह्या पुस्तिकेला बंधू संजय पोटे ह्यांनी प्रस्तावना दिली आहे.

## लॉज वार्ता, अकोला




बंधू ॲड संजयजी पोटे, अध्यक्ष मराठी थिऑसॉफीकल फेडरेशन, बंधू प्रा. डॉ. अशोक सोनोने, अध्यक्ष अकोला लॉज, भगिनी सौ. संगिताताई सोनोने व बंधू डॉ. श्रीकांत उखळकर अध्यक्ष TOS अकोला यांनी दि. २४ फेब्रु. २४ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगाव (खुर्द) येथे भेट दिली व शालेय वाचनालयासाठी ३० बाल साहित्याची पुस्तके भेट दिलीत.

बंधू डॉ. श्रीकांत उखळकर, भगिनी सौ. अनूश्री उखळकर व प्रा. श्रीमती उषाताई फुरसुले ह्यांनी दि. २७ फेब्रु. रोजी जिल्हा परिषद प्राथ. शाळा सिंदखेड (मोरेश्वर) ता. बार्शिटाकळी येथे भेट दिली व शालेय वाचनालयाला ४० बाल साहित्यविषयक पुस्तकांचा संच भेट दिला. यावेळी मराठी राजमाता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभाग घेतला.

'स्वराधार' साप्ताहिक संगित वर्ग स्थानिक गायत्री बालिकाश्रम येथे सातत्याने सुरु असून बंधू डॉ. अमोल गावंडे सदर वर्ग घेत आहेत. दि. १७ फेब्रु. रोजी अड्यार डे च्या निमित्ताने जानेवारीत आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ घेण्यात आला. ह्यावेळी मुख्य अतिथी म्हणून आकाशवाणी केन्द्र अकोला येथे कार्यक्रम अधिकारी विजय दळवी यांची उपस्थिती लाभली. बंधू अशोक सोनोने, परिक्षक प्रा. यादव वक्ते, डॉ. किरण वाघमारे व बंधू एस. के. कदम यांच्या हस्ते बक्षिस पात्र स्पर्धकांना सन्मानित करण्यात आले.

बंधू डॉ. श्रीकांत उखळकर, बंधू डॉ. राहूल अंबाडकर व डॉ. श्वेता देशमुख यांनी दि. २३ मार्च रोजी जि.प. प्राथमिक शाळा म्हैसांग येथे भेट दिली. शालेय वाचनालयास बालसाहित्य संच भेट व विद्यार्थ्यांची आरोग्य व दंत तपासणी करण्यात आली. डॉ. राहूल अंबाडकर यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

तीन दिवसीय जीवन कौशल्य विकास व निसर्ग अभ्यास शिबिर मे महिन्यात लोटस् डे च्या निमित्ताने आयोजित करण्यात आले आहे.






मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन पुणे व थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्विस, अकोला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने अड्यार डे निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन संयोजक डॉक्टर श्रीकांत उखळकर व मथिपे चे अध्यक्ष ॲड. संजय पोटे यांचे मार्गदर्शनात करण्यात आले. या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अकोला लॉज मध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सभासद हरिश्चंद्र पिसे, कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अकोला आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी श्री विजय दळवी, अतिथी व परीक्षक प्रा. यादव वक्ते आदी मान्यवर उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक व निबंध स्पर्धेचे आयोजना मागील भूमिका अकोला लॉज चे अध्यक्ष डॉ. अशोक सोनवणे यांनी विषद केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अड्यार डे बद्दल बंधू श्रीराम नवथळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सोसायटीचे सभासद रंजीत पवार, प्रदीप वालचाळे, राजू उखळकर, प्राध्यापक राजू रणपिसे, मेघा रणपिसे, सौ संगीता सोनोने, रामभाऊ भटकर, वासुदेव ननोमा, रामा आखतकर, अंजली सोनवणे, सौ ज्योती आखतकर, उपस्थित होते. एकूण ४५ स्पर्धक उपस्थित होते.

---

## मैत्रय लॉज, नागपूर येथील सभा



## III. थिऑसॉफिस्टचे कार्य आणि पात्रता

१. प्रत्येक थिऑसॉफिस्टला आतून साहसी असणे आवश्यक आहे; त्याने वेळेच्या आणि मिळालेल्या संधिच्या पलीकडे गेलंच पाहिजे आणि मग पहा अनंतकाळची झलक.

२. प्रत्येक थिऑसॉफिस्टने आतील अडथळा तोडून संपूर्ण पुरुषत्वचा अनुभव घेतला पाहिजे.

३. थिऑसॉफिस्ट हे शोधणारे आणि विश्वासणारे असावेत, वैमनस्याशिवाय मतभिन्नतेचे स्वागत करणारे असावेत.

४. प्रत्येक थिऑसॉफिस्टने त्याच्या स्वतःच्या कृतींमध्ये वैश्विक तत्त्वे लागू केली पाहिजेत.

५. नेते असोत किंवा अनुयायी असोत सर्व थिऑसॉफिस्ट हे संयुक्त भागीदार आहेत.

६. थिऑसॉफिकल सोसायटीचा प्रत्येक सदस्य एक नेता आहे; प्रत्येकात एक तरी महान पोषक स्पार्क असतो.

७. थिऑसॉफिस्ट नशिबाशी सहयोग करत आहेत - दुसऱ्या प्रकारची सभ्यता जागृत करत आहेत

८. सत्य आणि आंतरिक शुद्धतेवर आधारित थिऑसॉफिस्टचे हावभाव, कृती, कार्य आणि अगदी मौन असणे आवश्यक आहे.

९. थिऑसॉफिस्टचे कर्तव्य त्याच्या कर्मावर अवलंबून असते; प्रत्येक थिऑसॉफिस्ट त्याला काय करायचे आहे हे त्याने स्वतःच ठरवावे; पण काही मूलभूत आपण जे काही करतो त्यामध्ये तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

१०. एक थिऑसॉफिस्ट त्याच्या वचनबद्धतेपासून सुटू शकत नाही; त्याला आंतरराष्ट्रीय आणि वैयक्तिक वचनबद्धतेला सामोरे जावे लागेल.

११. एक सक्षम थिऑसॉफिस्ट पूर्णपणे आधुनिक ज्ञानासह सुसज्ज असावा.

१२. थिऑसॉफिस्टने सत्य शोधून ते जगाला दिले पाहिजे.

१३. थिऑसॉफिस्ट हे मानवतेचे मित्र आहेत; त्यांना त्या शीर्षकाची कमाई आणि त्यास पात्र होऊ द्या.

१४. आपल्याला योग्य वाटते तसे जगणे- आपल्या विश्वासावर जगण्यासाठी- स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आपल्याला, थिऑसॉफिस्टना, धैर्याची गरज आहे-

१५. थिऑसॉफिस्टला दिलेली सर्वात वाईट प्रशंसा म्हणजे ते निरुपद्रवी असतात .

१६. थिऑसॉफिस्टचा प्रभाव नकारात्मक नसून सकारात्मक असला पाहिजे; आम्ही राजकारण, धर्म आणि मानवतावादी आणि शैक्षणिक क्षेत्रात आपला आवाज उठवला पाहिजे.

१७. जेव्हा थिऑसॉफिस्टला वास्तविक मूल्याची एखादी गोष्ट सापडते, तेव्हा त्याने ती इतरांसोबत शेअर केली पाहिजे.

१८. थिऑसॉफिस्टचे बंधन म्हणजे सत्याचा सामान्य शोध.

१९. जर थिऑसॉफिस्ट म्हणून आम्हाला थिऑसॉफिकल सोसायटीत आमच्यासाठी कार्य करायची असेल, तर ती आमच्यासाठी एक आरामदायक जागा असेल, यासाठीआम्ही नशिबवान आहोत.

२०. थिऑसॉफिस्टना पूर्वनियोजित ध्येयाची दृष्टी दिली गेली नाही, पण प्रवासाच्या महानतेबद्दल दृष्टी दिली गेली.

२१. एका थिऑसॉफिस्टने चांगल्या माणुसकीसाठी एक शुद्ध साधन बनण्यास इच्छुक असले पाहिजे आणि जीवनाच्या प्रवाहात स्वतःला वाहून घेतले पाहिजे.

२२. थिऑसॉफिस्टने स्वतःमधील आणि बाहेरील मतभेद दूर करण्यासाठी कठोर परिश्रम केले पाहिजेत; त्याचे कार्य संघर्ष दूर करणे, वैयक्तिक पध्दतिने वेगळेपणा स्थापित करणे आहे, आणि संपूर्ण जीवनाच्या एकतेचा आणि पद्धतीचा शोधा घेणे आवश्यक आहे.

२३. थिऑसॉफिस्ट ही एक संतुलित व्यक्ती असावी जी अंतर्मुख आणि बाह्यमुख होऊन जाते

२४. थिऑसॉफिस्टने सदस्यांसाठी नव्हे तर मानवतेसाठी कार्य केले पाहिजे.

२५. दु:खींचे सांत्वन करणे हे थिऑसॉफिस्टचे कर्तव्य आहे; अज्ञानींना शिकवण्यासाठी.

२६. प्रत्येक थिऑसॉफिस्टने त्याच्या आत्म्यापासून ताजे पाणी काढले पाहिजे आणि थिऑसॉफिकल सोसायटीसाठी योगदान दिले पाहिजे.

२७. थिऑसॉफिकल सोसायटीचा प्रत्येक सदस्य हा प्रचारक पेक्षा अधिक शिकणारा असावा

२८. त्याने बोलण्यापेक्षा अधिक शांत असले पाहिजे कारण बोलण्यापेक्षा धिराने ऐकणे सोपे आहे.

ही विधाने थिऑसॉफिकल सोसायटीच्या 14 जुलै ते 22 जुलै 1966 या कालावधीत साल्सबर्ग (ऑस्ट्रिया) येथे थिऑसॉफिकल सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात जगभरातील नेत्यांनी त्यांच्या व्याख्यानात आणि भाषणात व्यक्त केली आहेत.
** व्दारा प्रकाशित – डॉ. बी.आर. मुल्लिक, आग्रा (३१ जुलै १९६६) ( Highlights of Modern Theosophical Thought )
** पुनरुत्पादित – अरुण पलकृत, पुणे व्दारा प्रचलित. (१७ नोव्हेंबर २०२२ थिऑसॉफिकल सोसायटी स्थापना दिवसाच्या निमित्ताने प्रकाशित)